# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील
## कलम ४ (१) (ख) (i)

| कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे |
|---|---|
| **पत्ता** | १३२/ब, भोसले नगर, भांबुर्डा, पुणे-७ |
| **कार्यालय प्रमुख** | महासंचालक, कृषि परिषद |
| **शासकीय विभागाचे नाव** | कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ |
| **मंत्रालयातील कोणत्या खात्याच्या अधिनस्त** | कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ |
| **कार्यक्षेत्र भौगोलीक/कार्यानुरूप** | महाराष्ट्र |
| **विशिष्ट कार्ये** | राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांच्या कार्यामध्ये, विशेषतः शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण व समान हितसंबंध असलेल्या इतर बाबी यांच्याशी संबंधित कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्यासाठी आणि विद्यापीठाच्या कार्याचे नियतकालिक मुल्यमापन करण्यासाठी आणि विद्यापीठे आणि त्यांची शैक्षणिक कार्ये व वित्तीय व्यवहार यांवर देखरेख ठेवणे. |
| **विभागाचे ध्येय/धोरण** | राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांच्या कार्यामध्ये, विशेषतः शिक्षण, संशोधन विस्तार शिक्षण व समान हितसंबंध असलेल्या इतर बाबी यांच्याशी संबंधित कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणणे. |
| **सर्व संबंधित कर्मचारी** | महासंचालक (१), संचालक (३), सहसंचालक (२), व तृतीय (२६), व चतुर्थ श्रेणी कर्मचारी (९) एकूण ४१. |
| **कामाचे विस्तृत स्वरूप** | १) विद्यापीठाच्या वार्षिक योजना व अशा योजनांचे भाग असणाऱ्या योजना यास मान्यता देणे.<br>२) कलम ५४ च्या उपबंधाच्या अधीन राहून विद्यापीठाच्या वार्षिक वित्तीय अंदाजांना मान्यता देणे.<br>३) अर्थसंकल्पीय अनुदानांचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी म्हणून विद्यापीठाने मांडलेल्या कोणत्याही प्रस्तावास मान्यता देणे.<br>४) कोणत्याही नवीन विद्याशाखा, पाठयक्रम किंवा ज्ञानशाखा किंवा विभाग सुरू करण्यासाठी त्याचप्रमाणे कोणत्याही अभ्यासक्रमासाठी जादा वैकल्पिक विषय सुरू करण्याकरिता विद्यापीठांना परवानगी देणे.<br>५) कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्याच्यावरील अंदाजित |

| | |
|---|---|
| | खर्च रू. तीन लाख किंवा त्याहून आधिक आहे अशा कोणत्याही इमारतीच्या बांधकामांस प्रशासकीय मान्यता देणे.<br>६) कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्यावरील अंदाजित खर्च रू. पाच लाख किंवा त्याहून अधिक आहे अशा साधनसामुग्रीच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता देणे.<br>७) विद्यापीठांच्या कार्यात प्रभावी समन्वय घडवून आणण्याच्या आणि त्यांना योग्य मार्गदर्शन व निर्देशन करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन, फलोत्पादन, वनशास्त्र, दुग्धशाळा, विज्ञान व अन्नतंत्रशास्त्र आणि मत्स्य व्यवसाय यांच्याशी संबंधित असलेली कामे धरून, कृषि शिक्षण, अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम यांच्या संबंधात, विद्यापीठामध्ये पार पाडण्यात आलेल्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.<br>८) त्यांनी केलेल्या नियतकालीक मुल्यमापनासंदर्भात विद्यापीठाच्या कामकाजाविषयी कुलपतींला सूचित करणे.<br>९) परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर विद्यापीठास योजनांतर्गत व योजनेतर अशा दोन्ही प्रकारचे निधी आवश्यक वाटेल अशा कालांतराने देण्याविषयी राज्य शासनास विनंती करणे.<br>१०) राज्य शासनाद्वारे तिच्याकडे निर्दिष्ट केल्या जातील अशा विद्यापीठाच्या कार्याशी संबंधित कोणत्याही बाबीविषयी राज्य शासनास सल्ला देणे.<br>११) या अधिनियमांचे उपबंध अंमलात आणण्यासाठी अनुषंगिक व आवश्यक असेल अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कामे पार पाडणे. |
| **मालमत्तेचा तपशील** | जागा १०,००० चौ.मी. व त्यावरील इमारत २३९३ चौ.मी. |
| **संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचा प्रत्येक स्तरावरील तपशील** | संरचनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. |
| **कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक व वेळा** | ०२०-२५५२८२०८,२५५२८६८८,२५५२८५७७<br>सकाळी – ९.४५ ते दुपारी १.३० व दुपारी २.०० ते संध्याकाळी ६.१५ |
| **साप्ताहिक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा** | साप्ताहिक सुट्टी शनिवार व रविवार, शासनाने घोषित केलेल्या सुट्टयांचे दिवशी व जिल्हाधिकारी, पुणे यांनी जाहिर केलेल्या स्थानिक सुट्टयांच्या दिवशी कार्यालय बंद राहील. |